अधिसूचना

क्रमांक : ६५/२०२३ दि. ०३/०५/२०२३

विषय – पर्यावरण पुरस्कार – २०२२

सर्व सामान्यांच्या माहितीकरिता कळविण्यात येते की, पर्यावरण पुरस्कार प्रदान करण्यासंबंधीचे विनियम क्र. ४/२०१८ नुसार पर्यावरणासंबंधी विद्यापीठाला प्राप्त झालेल्या विविध पुरस्कारांच्या मूळ रकमेच्या व्याजातून विद्यापीठस्तरावर सुरु करण्यात आलेल्या '' **पर्यावरण पुरस्कार - २०२२** '' साठी **"गट - अ"** मधून **प्रयास, यवतमाळ** यांची पुरस्कार निवड समितीने एकमताने निवड केली आहे. तर **"गट - ब"** मधून एकही प्रस्ताव पुरस्काराकरिता पात्र नसल्यामुळे या गटातून कोणाच्याही नावाची निवड करण्यात आली नाही.

पर्यावरणासंबंधी वृक्षारोपण, जलव्यवस्थापन, जलसंवर्धन, जनजागृती, जैवविविधता संरक्षण, संवर्धन व व्यवस्थापन, अपारंपारिक उर्जा स्त्रोताचा वापर व प्रसार या संबंधित केलेल्या महत्त्वाचे व उत्कृष्ट कार्याबद्दल **"गट - अ"** मधून **प्रयास, यवतमाळ** यांना संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचा **'पर्यावरण पुरस्कार – २०२२'** घोषित करण्यात आला आहे.

स्वा/-
(डॉ. तुषार देशमुख)
कुलसचिव
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

*****